


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक ३१६, शनिवार ७ सप्टेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# खा.नीलेश लंकेंचा भाजपाला धसका!

■ गुजरातच्या पदाधिकाऱ्यांची टिम नगर जिल्ह्यात ■ केंद्रीय मंत्री अमित शहांच्या हाती सुत्रे

**नगर : प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीत नगर दक्षिण मतदारसंघात खा. नीलेश लंके यांनी विखेंच्या विरोधात विजय संपादन केला तसेच जिल्ह्यातील दोन्ही जागा महायुतीच्या हातातून निसटल्या. आगामी काळात विधानसभा निवडणूकीत खा.लंके जिल्ह्यात पुन्हा काय करिश्मा करणार याचा धसका भाजपाने घेतला आहे, त्यामुळे आता विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने आतापासूनच सावध पवित्रा घेत रणनिती आखण्यास सुरवात केली आहे. त्याची सूत्रे थेट केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी हातात घेतल्याची अधिकृत सुत्रांची माहिती आहे. गुजरातमधील आमदार आणि पदाधिकाऱ्यांची टीम त्यांनी नगर जिल्ह्यात धाडली आहे. आमदार जगदीश मकवाणा आणि आमदार किशोरीलाल बेनिवाल आपल्या सहकाऱ्यांसह येथे दाखल झाले आहेत.**

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांचा संगमनेर मतदारसंघ आणि शेजारील अकोले मतदारसंघातील संघटनात्मक कामाला गती देण्याचे काम ते करणार आहेत. विधानसभा निवडणुकीपर्यंत म्हणजे पुढील दोन महिने ते येथे तळ ठोकून राहणार असल्याचे सांगण्यात आले.

लोकसभेचा अनुभव लक्षात घेता महाराष्ट्र विधानसभेसाठी भाजपने आणखी जोर लावण्याचे धोरण अवलंबल्याचे दिसते. खुद्द शहा यांनीच राज्यात लक्ष घातल्याचे सांगण्यात येते. त्यासाठी त्यांच्या विश्वासातील गुजरातमधील आमदार आणि पदाधिकारी त्यांनी महाराष्ट्रात पाठविले आहेत. नाशिकमध्ये अलीकडेच भाजपचे नियोजन बैठक झाली. त्या बैठकीतही गुजरातमधील काही नेते उपस्थित होते. तेथेच नगरचेही नियोजन करण्यात आल्याचे सांगण्यात येते. जिल्ह्यातील सर्व मतदारसंघासाठी एका आमदाराची नियुक्ती करण्यात आली आहे. हे आमदार आतापासूनच मतदारसंघात मुक्काम ठोकून नियोजनाचे काम करणार आहेत.

त्यानुसार संगमनेर व अकोले तालुक्यासाठी नियुक्त केलेले आमदार जगदीश मकवाणा आणि आमदार किशोरीलाल बेनिवाल आपल्या सहकाऱ्यांसह येथे दाखल झाले आहेत. स्थानिक पदाधिकाऱ्यांशी समन्वय साधून ते नियोजन करणार आहेत. संगमनेर हा थोरातांचा मतदारसंघ भाजपच्या स्थानिक नेत्यांही प्रतिष्ठेचा केला आहे. काँग्रेसचे भावी मुख्यमंत्री असा उल्लेख होत असलेले बाळासाहेब थोरात यांचा हा मतदारसंघ असला तर यावेळी त्यांची कन्या डॉ. जयश्री थोरात यांच्याही नावाची चर्चा सुरू आहे. तर दुसरीकडे आपण संगमनेर किंवा राहुरीतून निवडणूक लढवू शकतो, असे भाजपचे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांनी पूर्वी एकदा म्हटले होते.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा शिर्डी मतदारसंघ आहे. मात्र, तेथे थोरात यांनी लक्ष घातले आहे. तर दुसरीकडे विखे पाटील यांनीही गेल्या अनेक वर्षांपासू संगमनेरमध्ये लक्ष घातले आहे. या पार्श्वभूमीवर आता भाजपचे थेट गुजरातचे आमदार नियोजनासाठी या मतदारसंघात पाठविण्यात आले आहेत. आता यावर थोरात यांचा काय प्रतिक्रिया येते, याकडे लक्ष लागले आहे.



### ...म्हणून संगमनेर टार्गेट

नगर दक्षिण लोकसभा निवडणुकीत माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी महाविकास आघाडीचा धर्म पाळत खा.नीलेश लंके यांना या मतदारसंघातही मदत केली होती याचे शल्य विखे पितापूत्रांना असल्याने पराभवानंतर त्यांनी संगमनेर मतदारसंघ टार्गेट केला आहे.

### प्रभावती घोगरेंची धास्ती !

विखे यांच्या लोणी गावातील त्यांच्या विरोधात असणाऱ्या सरपंच प्रभावती घोगरे यांनी लोकसभा निवडणुकीत विखे पिता पुत्रांवर टिकेची झोड उठवित लंके यांचा प्रचार केला होता.विजयानंतरही त्यांचा पारनेरशी संबंध कायम राहिला आहे.त्यामुळेच घोगरे या राहत्यातून निवडणूक लढविणार का ? ही धास्ती विखेंना पडली आहे.

### खा.लंके ठरणार जिल्ह्यात किंगमेकर

लोकसभा निवडणुकीत बलाढ्य शक्ती विरोधात निवडून आलेल्या खा. लंके यांनी विधानसभा निवडणुकीत जिल्ह्यातील महाविकास आघाडीचे सर्वच्या सर्व उमेदवार विजयी करून मुंबईला घेऊन जाणार असल्याची घोषणा केल्यानंतर महायुतीचे वरिष्ठ खडबडून जागे झाले आहेत त्याचाच परिपाक म्हणून त्यांनी नगर जिल्ह्यात लक्ष घातले आहे. खा. लंके यांनी विजयानंतर संपूर्ण जिल्ह्यात लक्ष घातल्याने आगामी विधानसभा निवडणुकीत खा.लंके जिल्ह्यात किंगमेकर ठरणार असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे.

# जामगावकरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार!

■ नाम फाउंडेशनची किमया भारी ■ बिरोबाचा तलाव तुडुंब भरला ■ जलपूजन संपन्न ; ग्रामस्थांमध्ये आनंदी वातावरण ■ सारोळा, दैठण्यालाही होणार फायदा

**जामगाव : विशेष प्रतिनिधी**

**महाराजा माधवराव शिंदे यांचा ऐतिहासिक वारसा लाभलेले जामगाव हे गाव सुमारे साडेपाच हजार लोकसंख्येचे गाव. मात्र कायमच पाण्याचे दुर्भिक्ष्य. अगदी पावसाळ्यात देखील टँकरने पाणीपुरवठा करावा लागतो.मात्र नाम फाउंडेशनच्या किमयाने यावर्षी हे चित्र पालटणार असून आता जामगावकरांना कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याबरोबरच काही प्रमाणात शेतीच्या पाण्यालाही मदत होणार आहे.**

जामगावला बिरोबाच्या तलावा जवळी विहिरीवरून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यात येतो हा बिरोबाचा तलाव साधारणता: १९७२ च्या दरम्यान झालेला आहे मात्र या तलावात मोठ्या प्रमाणात गाळ साठल्याने तलावात येणारे पाणी वाहून जात होते.त्यामुळे तलाव पूर्ण क्षमतेने भरत नसल्याने गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीलाही पाणी लवकर आटत असल्याने गावाला कायमच पाणीटंचाईला सामोरे जावे लागत होते.जामगावच्या पिण्याच्या पाणीपुरवठ्यासाठी भारत निर्माणसह अनेक योजना राबविण्यात आल्या. मात्र प्रत्यक्षात या योजना यशस्वी न झाल्याने जामगावकर कायमच पिण्याच्या पाण्यापासून वंचितच होते.

वर्षभरातील सुमारे चार ते पाच महिने अगदी पावसाळ्यापर्यंत या गावाला टँकरने पाणीपुरवठा करण्यात येतो.यावर्षीही गेल्या महिन्यापर्यंत पाणीपुरवठ्याच्या विहिरीत टँकरने पाणी ओतून गावाला पाणीपुरवठा केला आहे.गावात सतत पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवत असल्याची ही बाब लक्षात घेऊन काही महिन्यापूर्वीच गावची सत्ता हातात घेतलेल्या सरपंच पुष्पाताई माळी यांनी नाम फाउंडेशनच्या माध्यमातून तलावाच्या खोली व रुंदीकरणाचे काम हाती घेतले. नाम फाउंडेशनमी देखील या कामी सहमती दर्शवित प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली.या तलावातील सुमारे दोन लाख ब्रास इतका गाळ उपसण्यात आला याचा फायदा देखील जामगावातील शेतकऱ्यांना सुपीक जमीन करण्यासाठी झाला.गाळ उपसल्यानंतर तलावात उभे बोअरवेल मारण्यात आले. यामुळे वाहून जाणारे पाणी या बोअरवेलच्या माध्यमातून तलावामध्येच साठले गेले. तलावाची खोली व रुंदी वाढल्याने पूर्वीपेक्षा चार पटीने पाणी साठ्यात वाढ झाली आहे.

तलावाबरोबरच गावाला पाणीपुरवठा करणाऱ्या विहिरीतही आडवे बोअर घेण्यात आले आहे.या बोरलाही मुबलक प्रमाणात पाणी लागल्याने आता तलावाबरोबरच पाणीपुरवठा

उर्वरीत पान ३ वर



### नाम फाउंडेशनमुळेच काम शक्य !

नाम फाउंडेशन केलेल्या या कामामुळे जामगावच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार आहे.तसेच जामगावसह सारोळा अडवाई , देठणे गुंजाळ येथील शेतकऱ्यांनाही याचा फायदा होणार आहे. हे काम केवळ नाम फाउंडेशनमुळेच शक्य झाल्याने त्यांचे आभार.

**पुष्पाताई माळी**
सरपंच जामगाव

### धबधबे ओसांडणार !

बिरोबाचा तलाव पूर्ण क्षमतेने भरल्यानंतर सांडव्यातून पाणी बाहेर पडते. खळखळ वाहणाऱ्या या पाण्याचे धबधब्यात रूपांतर होते.हे विहंगम दृश्य पाहण्यासाठी व सेल्फी घेण्यासाठी आजूबाजीची तरुणाई येत असते.आता एकाच पावसानंतर धबधबे ओसांडतील असे सध्याचे चित्र आहे.

### शाश्वत कामाचे समाधान

विकास प्रक्रिया ही निरंतर चालणारी आहे. वेगवेगळी विकासकामे होतच असतात.मात्र गावच्या पाणलोटासाठी बिरोबा तलावासह इतरही शाश्वत कामे करता आल्याचे समाधान आहे. आगामी काळातही पाणीदार जामगावसाठी प्रयत्नशील राहणार

**बाळासाहेब माळी**
मनसे,तालुकाप्रमुख

# माता - भगिनींनो तुमच्यासाठी भविष्यकाळ उज्ज्वल!

■ विश्वनाथ कोरडे यांचा लाडक्या बहीणींना शब्द ■ टाकळी ढोकेश्वरला रंगला खेळ पैठणीचा



**टाकळी ढोकेश्वर : प्रतिनिधी**

**महायुती सरकार व पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणावर दिला जात असलेला जोर आणि वरिष्ठ नेतृत्वाचा आदर्श घेवून कार्यकर्त्यांच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर होत असलेले महिला सबलीकरणाचे काम पाहता येणारा भविष्यकाळ हा माता -भगिनींनीसाठी उज्वल असणार असून तो तुमच्यासाठीच असणार असल्याचे मत भाजपाच्या प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी व्यक्त केले.**

टाकळी ढोकेश्वर येथे युवा मंचच्या वतीने अभीष्टचिंतन सोहळ्याच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या होममिनिस्टर-खेळ पैठणीचा या कार्यक्रमा दरम्यान हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेल्या महिला भगिनींशी संवाद साधताना कोरडे बोलत होते.

यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष दुधाडे, टाकळी ढोकेश्वरचे माजी सरपंच शिवाजी खिलारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी उपसभापती विलास झावरे, भाजपचे तालुका उपाध्यक्ष अर्जुन नवले, बापुसाहेब रांधवण, पुजाताई कोरडे, भाजपाच्या पारनेर महिला अध्यक्षा सोनालीताई सालके, भाजपचे जिल्हा कार्यकारणी सदस्य नवनाथ सालके, कानिफनाथ ठुबे, बापुसाहेब रांधवन, धनंजय शिंदे, बाजीराव जाधव, जगदीश आंबेडकर, दीपक रोहकले, संजय झावरे, शिवाजी रोकडे, संभाजी भाईक, भरत ठुबे, गोकुळ ठुबे, संदीप ठुबे, अनिल कोरडे, सचिन भोर यांसह हजारोंच्या संख्येने महिला भगिनी उपस्थित होत्या.
कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विश्वनाथ कोरडे युवमंचचे तालुका उपाध्यक्ष संकेत झावरे यांसह रविंद्र पायमोडे, संगम बांडे, रोहित ठुबे, तुषार बांडे, दत्तात्रय झावरे, संकेत बांडे, धोंडिभाऊ झावरे, ऋषी बांडे यांसह टाकळी ढोकेश्वर गावच्या विविध सदस्यांनी विशेष प्रयत्न केले.

पुढे बोलताना कोरडे यांनी सांगितले की, महिला सक्षमीकरण ही एक दिर्घकाळ व निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. या प्रक्रियेच्या द्वारे महिला सामुहिकपणे विकासाच्या ध्येयाने प्रेरित होऊन कार्यप्रवण राहातात. महिला आर्थीकदृष्ट्या स्वावलंबी स्वयंनिर्भर होतील तेव्हाचाच सर्व क्षेत्रात आत्विश्वासाने वावरु शकतील ह्या विचारातून महायुती सरकारच्या माध्यमातून लाडकी बहिण योजना राबविण्यात आली परंतु खेदाची बाब म्हणजे या योजनेला कडाडून विरोध करणाऱ्या विरोधी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी राज्यातील अनेक भागात श्रेय लाटण्याचा केलेला केविलवाणा प्रयत्न उर्वरीत पान ३ वर

# काँग्रेस सरकार आल्यास ३ हजार रुपयांची महालक्ष्मी योजना

■ दरवर्षी एक हजार रुपयांची वाढ ■ प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची मोठी घोषणा

**मुंबई : प्रतिनिधी**



**राज्यामध्ये काँग्रेस सरकार आल्यास लाडकी बहीण योजनेला तोडीस तोड अशी महालक्ष्मी योजना महिलांसाठी आणू. यात तर महिन्याला महिलांना तीन हजार रुपये देण्यात येतील आणि प्रत्येक वर्षाला त्यात हजार रुपयांची वाढ करू, अशी घोषणा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी यांनी केली आहे. आम्ही लाडकी बहीण योजनेचे स्वागतच केले आहे. मात्र ती योजना कायम राहावी, भगिनींची दिशाभूल होऊ नये, बँकेत पैसे गेले ते बँक वाल्यांनी गायब केले, असे होऊ नये, असे म्हणत नाना पटोले यांनी राज्य सरकारवर टीकास्त्र सोडले.**

लाडकी बहीन योजनेवरुन राज्य सरकार इव्हेंट करत आहे. या इव्हेंटच्या माध्यमातून लूट चालू असल्याचा आरोप देखील नाना पटोले यांनी केला आहे. मात्र, भगिनींना बँकेत किती त्रास आहे माहित आहे का? असा प्रश्न देखील त्यांनी उपस्थित केला. काँग्रेसचे सरकार आल्यास आम्ही या पेक्षा चांगली योजना आणणार असल्याचा दावा पटोले यांनी केला आहे. महालक्ष्मी योजनेच्या नावाने ही योजना आणणार असून त्यामध्ये मात्र महिलांना तीन हजार रुपये देण्यात येणार आहे. तसेच त्यात दर व्रषी एक हजार रुपयांची वाढ करणार असल्याचे देखील नाना पटोले यांनी म्हटले आहे.

योजनेमध्ये दरवर्षी एक हजार रुपयांची वाढ करणार राज्य सरकारने लाडकी बहिणी योजना जाहीर केल्यापासून महाविकास आघाडीच्या वतीने या योजनेवर टीका करण्यात येत आहे. त्यात आता नाना पटोले यांनी यापेक्षाही चांगली योजना आणण्याची

उर्वरीत पान ३ वर







निरोगी आरोग्याचा कानमंत्र...

# निरामय

## बुरशीजन्य संसर्ग रोखा!

### आरोग्यावर वाईट परिणाम



**बुरशीजन्य संसर्गामुळे अनेक लोकांच्या नखांवर पिवळसरपणाचा खडबडीतपणा तुम्ही पाहिला असेल. त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे आरोग्याशी खेळणे. ही बुरशी तुमच्या आरोग्यासाठी अतिशय हानीकारक. मेलेनोमा स्किन कॅन्सरचे सगळ्यात खतरनाक रूप आहे...**

एखाद्याची तब्येत बिघडली आणि तो डॉक्टरकडे गेला की डॉक्टरही नखे बघतात. याचे कारण म्हणजे नखांवरून व्यक्तीचे आरोग्य ओळखता येते. डॉक्टरांव्यतिरिक्त, आपण आपली नखे पाहूनदेखील आपल्या आरोग्याबद्दल जाणून घेऊ शकता. वास्तविक, नखे हा शरीराचा एक महत्त्वाचा भाग आहे जो आरोग्याचे रहस्य सांगतो. ज्याची प्रकृती ठीक नसते, त्याच्या नखांमध्ये काही लक्षणे दिसू लागतात. याचा अर्थ असा की नखे तुम्हाला सूचित करत आहेत की तुमच्या शरीरात काहीतरी गडबड आहे आणि लगेच डॉक्टरकडे जाण्याची गरज आहे.

#### पिवळी नखे

जास्त वेळ नेलपॉलिश लावल्यानेही नखं पिवळी पडू शकतात, पण नखांच्या सभोवतालच्या इतर बदलांकडेही लक्ष देणं खूप गरजेचं आहे. नखांभोवतीची त्वचा जर पिवळी असेल तर ते थायरॉईडचे लक्षणही असू शकते. थायरॉईडमुळे नखे जाड, कोरडी, ठिसूळ होऊ शकतात. थायरॉईडमुळे नखे जाड, कोरडी, ठिसूळ होऊ शकतात. अमेरिकन ॲकॅडमी ऑफ डर्मेटोलॉजी असोसिएशनच्या मते, सुजलेली बोटे, अंगभूत नखे ही थायरॉइडची लक्षणे आहेत.

#### नखांवर रेषा


नखांवर रेषा दिसणे हे आरोग्यातील सगळ्यात गंभीर लक्षण आहे. नखांवर दिसणारी रेष हे मेलेनोमाचे संकेत आहेत. नखांच्या खाली होणारा एक प्रकार आहे ज्याला स्किन कॅन्सर असे म्हणतात. हे हाता पायाच्या बोटांमध्ये देखील दिसते. कायम लोकं या सगळ्याकडे दर्लक्ष करतात. पण यामुळे आजूबाजूच्या त्वचेला देखील हानी पोहोचवू शकते.

- खोबरेल तेल लावा : नखांमध्ये बुरशी येण्याचे कारण म्हणजे त्यांची नीट स्वच्छता न करणे. त्यामुळे त्यामध्ये घाण साचते. हे तुमच्या बोटांना झालेल्या दुखापतीमुळे देखील होऊ शकते. जेव्हा जेव्हा तुमच्या नखांमध्ये बुरशी येते तेव्हा त्यापासून आराम मिळण्यासाठी खोबरेल तेल लावा. बुरशीपासून मुक्त होण्यासाठी ही सर्वात प्रभावी कृती आहे.
- एलोवेरा जेल : एलोवेरा जेलमध्ये अँटीफंगल गुणधर्म असतात. अशा स्थितीत ते लावल्याने नखांमध्ये साचलेली घाण आपोआप बाहेर पडू लागते. म्हणूनच ते देखील लागू करा.
- बेकिंग सोडा : या समस्येपासून मुक्त होण्यासाठी तुम्ही बेकिंग सोडा वापरावा. यामुळे नखांमध्ये साचलेली घाण साफ होते. तुम्ही पेस्ट बनवून तुमच्या नखांवर लावू शकता.
- ॲपल व्हिनेगर : ॲपल सायडर व्हिनेगरमध्ये देखील अँटीफंगल गुणधर्म आढळतात, जे फंगल कमी करण्यासाठी चांगले काम करतात. तुम्हाला फक्त व्हिनेगरमध्ये थोडेसे पाणी मिसळून बोटे बुडवून घ्यायची आहेत, यामुळे तुम्हाला बराच आराम मिळेल. जर तुम्हाला तुमच्या नखांना बुरशीजन्य संसर्गापासून वाचवायचे असेल तर त्यांची साफसफाई करत राहा आणि लहान ठेवा. ते खूप मोठे होऊ देऊ नका. त्यामुळे बुरशीची लागण होण्याची शक्यता कमी होते. याचा तुमच्या शरीरावर परिणाम होतो.
- फिंगर क्लबिंग : कॅन्सर रिसर्चनुसार, जवळपास ३५ टक्के जीवघेण्या आजाराने त्रस्त असलेल्या लोकांची नखे अतिशय नरम असतात. नखांच्या बाजूची त्वचा ही सामान्य पेक्षा अधिक वक्र होते. त्याच वेळी, बोटांचे टोक सामान्यपेक्षा मोठे होतात. या अवस्थेला नखे किंवा फिंगर क्लबिंग म्हणतात.

## जमिनीवर बसून जेवण्याचे आरोग्यदायी फायदे...!

**आजकाल आधुनिक लाईफस्टाईलमुळे आपल्या शरीरात अनेक आजारही निर्माण होताना दिसून येत आहेत. गादीवर वा खुर्चीवर बसून जेवणं हे शरीराला घातक ठरतंय असंच दिसून येत आहे. डायनिंग टेबलवर बसून आरामात जेवणं हे शरीराला अधिक नुकसानदायी ठरत आहे. कदाचित जमिनीवर बसून जेवायला अनेकांना लाज वाटत असेल अथवा आपल्या स्टेटसला साजेसे नाही असं वाटत असेल पण जमिनीवर बसून मांडी घालून जेवायला बसण्याचे शरीराला अनेक आरोग्यदायी फायदे मिळतात.**


- जमिनीवर बसून खाण्याचे फायदे : जमिनीवर बैठक मारून जेवणे ही पूर्वपरंपरागत भारतीय पद्धत असून वैज्ञानिकदृष्ट्या ही पद्धत अत्यंत योग्य ठरते. आपण जेवताना मांडी घालून बसतो, ज्याला सुखासन वा पद्मासन म्हटलं जातं. आयुर्वेदात सांगण्यात आल्याप्रमाणे जेवण सुखासन मुद्रेतच करायला हवे. कारण आपण जेवताना वाकून खातो आणि त्यामुळे पोटावर योग्य प्रेशर येतं आणि जेवण उत्तमरित्या पचण्यास मदत होते.
- वजन कमी करण्यासाठी फायदेशीर : उठणे आणि बसण्यामध्ये शरीराची गती ही जलद होते. जमिनीवर बसून जेवल्याने पोट लवकर भरल्यासारखे वाटते आणि प्रमाणापेक्षा जास्त खाल्ले जात नाही. तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर तुम्ही ही पद्धतच स्वीकारावी. मांडी घालून बसण्याने पोटावर ताण येतो आणि पोटाची हालचाल चालू राहाते. तसंच थकवा आणि शरीरातील कमतरता कमी करण्यासाठीही याचा फायदा होतो.



- शरीराच्या पोस्चरमध्ये येते सुधारणा : अन्य योगासनांप्रमाणेच सुखासनात बसल्याने मांसपेशी आणि सांधेदुखीपासून तुम्हाला आराम मिळतो. तसंच शरीराला लवचिकपणा मिळवून देण्यास याची मदत मिळते. तुमची पाठ सरळ राहून पायांना ताकद देण्याचे काम मांडी घालून बसल्यामुळे होते. काही अभ्यासानुसार, जेवताना मांडी घालून बसणे हे शरीरासाठी योग्य पोस्चर मानले जाते.
- पचनक्रिया होते उत्तम : जमिनीवर पाय क्रॉस करून बसल्याने पचनक्रिया अधिक चांगली होण्यास मदत मिळते आणि जमिनीवर ताट ठेऊन खाल्ल्याने शरीर पुढे मागे होत व्यवस्थित व्यायाम होतो. यामुळे अन्न त्वरीत पचण्यास मदत मिळते. मांसपेशी सक्रिय होऊन पोटातील ॲसिडचा स्राव वाढतो आणि अन्नपचन होते.
- शरीराचे स्ट्रेचिंग होते योग्य : जेव्हा आपण डायनिंग टेबलजवळील खुर्चीवर बसून खातो तेव्हा हिप्सचा भाग अधिक टाईट आणि स्ट्राँग होते तर जमिनीवर बसून खाल्ल्याने हिप्सचे फ्लेक्सर्स अगदी सहजपणाने स्ट्रेच करता येतात. तसंच शरीरात अधिक लवचिकता निर्माण होते.
- रक्तप्रवाह होतो जलद : जमिनीवर मांडी घालून बसून जेवल्यानंतर आपल्या शरीरातील रक्तप्रवाह जलद होतो. कारण यामुळे नसा शांत होतात आणि तणाव दूर होतो. जेव्हा आपण बसतो तेव्हा हृदय निरोगी राहते आणि आपल्या शरीरावर आणि हृदयावर कमी दबाव येतो. मांडी घालून बसल्याने रक्तप्रवाह संपूर्ण शरीराला समान स्वरूपात मिळतो. यामुळेच हृदयरोगी व्यक्तींना जमिनीवर बसून जेवण्याचा सल्ला देण्यात येतो.
- कुटुंबाशी जोडून ठेवण्यासाठी महत्त्वाचा दुवा : बसल्याने केवळ शरीरालाच नाही तर मानसिक आणि भावनिक आनंदही मिळतो आणि लाभ होते. कुटुंबासह एकत्र बसून जेवल्याचा आनंद आणि एकमेकांशी गोष्टी शेअर केल्याचा एक वेगळाचा आभास असतो. तसंच मोबाईल आणि टीव्हीपासून दूर असल्यामुळे अधिक आनंद मिळतो.

**कोणताही आजार, शारीरिक कमतरता जाणून घेण्यासाठी डॉक्टरांकडून प्रथम योग्य त्या चाचण्या करण्याचा सल्ला दिला जातो. मात्र याकडे अनेक जण दुर्लक्ष करत असल्याने वेळीच आणि अचूक निदान होण्यास अडथळे निर्माण होतात. तुमच्या आरोग्याविषयी अथवा तुम्हाला होणाऱ्या आरोग्यविषयक समस्यांचे जाणून घेत त्यांचे निदान करण्यासाठी तुम्हाला तुमच्या रक्ताचा, मूत्राचा, शरीरातील इतर द्रवपदार्थांचा किंवा शरीराच्या ऊतींचा नमुना घेण्याचा सल्ला दिला जातो. त्यानंतर, आपल्याला काही मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे लागेल. अशावेळी घाबरून न जाता चाचणीसाठी जाण्यापूर्वी काय करावे आणि करू नये याबाबत काही महत्त्वाच्या सूचना...**





## लॅब टेस्ट : हे पाळाच...

#### स्क्रिनिंग महत्त्वाचे

प्रयोगशाळेत केल्या जाणाऱ्या चाचण्या या विशिष्ट रोग किंवा स्थितीचे निदान किंवा तपासणी करण्यात मदत करू शकतात. स्क्रिनिंगमुळे लक्षणे दिसण्यापूर्वीच रोगाविषयी माहिती मिळण्यास मदत होते. इतर चाचण्यांमुळे एखाद्या तज्ज्ञाला एखाद्या आजाराचे निरीक्षण करता येईल किंवा रुग्णावर उपचार चालू आहे की नाही हे पाहावे लागेल. प्रयोगशाळेतील चाचणी देखील एखाद्या अवयव आणि शरीरातील व्याधीबद्दल आवश्यक असलेली माहिती देऊ शकते. परंतु, चाचणीसाठी जाण्यापूर्वी, तुम्हाला काही महत्त्वाच्या टिप्सचे पालन करावे लागेल.

- औषधाबाबत डॉक्टर्सना पूर्ण माहिती द्या : तुम्ही कोणतेही औषध घेत असाल तर डॉक्टरांना न चुकता कळवा. मसाज थेरपी किंवा फिजिओथेरपी नंतर रक्त तपासणी करू नका. आवश्यक जीवनसत्त्वे आणि पूरक आहाराबाबत तुमच्या डॉक्टरांशी चर्चा करा. लॅबमध्ये तपासणीला जाण्यापूर्वी या गोष्टी नक्की पाळा आणि काळजी घ्या. यामुळे तुमची चाचणी योग्य पद्धतीने होऊ शकते.
- शंका विचारून घ्या : तुमच्या डॉक्टरांशी केलेल्या चाचणीबाबत तुमच्या सर्व शंका दूर करण्याचा प्रयत्न करा. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार चाचणीपूर्वी काही ठराविक तासापर्यंत अन्नाचे सेवन न करणे आदींचे पालन करा जेणेकरुन अचूक निदानात मदत होईल.
- काहीही खाऊ नये : वैद्यकीय रक्त तपासणीपूर्वी तुम्ही काहीही खाणे टाळावे. तसेच चाचणीस जाण्यापूर्वी चरबीयुक्त आणि तळलेले अन्नपदार्थ खाणे टाळा तसेच १-२ दिवस आधी अल्कोहोलचे सेवन टाळा. चाचणीपूर्वी धूम्रपान करू नका.
- वेळेत चाचणीसाठी जा : दिवसाच्या वेळेनुसार एन्झाइम आणि संप्रेरक पातळी बदलू शकतात, जोपर्यंत तुमचे डॉक्टर तुम्हाला विशिष्ट वेळी जाण्यास सांगत नाहीत तोपर्यंत सकाळी १० वाजता चाचणीसाठी जाण्याचा प्रयत्न करा.




- तणावमुक्त राहा : कोणत्याही चाचण्या निवडण्यापूर्वी कोणतेही कठोर शारीरिक परिश्रम करू नका आणि तणावमुक्त रहा. चाचणीपूर्व १०-१५ मिनिटे शांत बसणे आणि आराम करणे आवश्यक आहे. शिवाय, चाचणीनंतरही, तुम्हाला पुरेसे पाणी पिण्याची आणि अस्वस्थता निर्माण करणाऱ्या शारीरीक क्रिया करणे टाळा.

## मेंदूला रक्तपुरणाऱ्या धमनीत रक्ताची गुठळी

**मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमी ही प्रक्रिया मेंदूला रक्तपुरवठा करणाऱ्या धमनीतून रक्ताची गुठळी काढून टाकण्यास मदत करेल. या लेखाच्या माध्यमातून या प्रक्रियेबद्दल सविस्तर माहिती देण्यात आली आहे.स्ट्रोकच्या रुग्णांना या माहितीचा नक्कीच फायदा होऊ शकेल.**

- स्ट्रोक नक्की कधी येतो? : स्ट्रोक किंवा मेंदूचा झटका जेव्हा तुमच्या मेंदूला रक्तपुरवठा कमी होतो किंवा व्यत्यय येतो तेव्हा होतो. बीफास्ट (बॅलेन्स - संतुलन कमी होणे, आईज- दृष्टी धूसर होणे किंवा कमी होणे, फेस- चेहऱ्याचा काही भाग क्षीण होणे, आर्म- हात कमकुवत होणे, स्पीच- बोलण्यात अडचणी आणि टाईम- वेळ) आणि कोणत्याही गंभीर गुंतागुंतीशिवाय बरे होण्यासाठी स्ट्रोकच्या गोल्डन अव्हरमध्ये उपचार घेणे गरजेचे आहे.
- स्ट्रोकमुळे मृत्यूच्या प्रमाणात वाढ : सध्या देशात स्ट्रोकचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. पक्षाघाताचा झटका सामान्यतः वृद्धांमध्ये दिसून येतो परंतु तरुणांनाही त्याचा त्रास होत असल्याची उदाहरणे समोर येत आहेत. शिवाय, यामुळे जगभरात मृत्यू दर वाढू वाढला आहे. स्ट्रोकमधून बरे होण्यासाठी मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमी उपयुक्त ठरू शकते.
- रुग्णाच्या गतिशीलतेवर परिणाम : ब्रेन स्ट्रोकसारखी आपत्कालीन स्थिती उद्‌भवल्यास, चार-पाच तासांच्या आत आयव्ही थ्रोम्बोलिसिसनंतर मोठ्या धमनीच्या अडथळ्यामध्ये किंवा अलीकडील शस्त्रक्रियेमुळे तसेच विंडो पिरियडच्या नंतरच्या परिस्थितीमुळे टीपीएची निवड करता येत नाही. मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमी हा एक सुरक्षित पर्याय आहे. डॉक्टरांकडूनही या पर्यायाला प्राधान्य दिले जात आहे.
- मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमी सुरक्षित पर्याय : मेंदूला रक्तपुरवठा करणाऱ्या धमन्यांमधील गुठळ्या काढून टाकून मेंदूच्या स्ट्रोकचे व्यवस्थापन करण्यासाठी मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमी हा सर्वात सुरक्षित असा पर्याय आहे. अशा प्रकारे, ही प्रक्रिया तीव्र इस्केमिक स्ट्रोक असलेल्या रुग्णांसाठी उपयुक्त आहे, कारण मेंदूला रक्तपुरवठा आवश्यकतेनुसार होत नाही. फॅट्स किंवा प्लेकमुळे मेंदूतील रक्तवाहिन्या अरुंद होतात.
- सिटी स्कॅन वा MRI ची घ्या मदत : सिटी स्कॅन किंवा एमआरआय स्कॅनसारख्या निदान तंत्रांमुळे धमनीच्या अडथळ्याबद्दल जाणून घेण्यास मदत होऊ शकते आणि त्यानंतरच डॉक्टर हे ठरवू शकतील की रुग्ण मेकॅनिकल थ्रोम्बेक्टॉमीसाठी योग्य आहे की नाही. चांगल्या परिणामांसाठी यांत्रिक थ्रोम्बेक्टॉमी समोरच्या धमन्यांमध्ये स्ट्रोक आल्यानंतर ६ तासांच्या आत आणि मेंदूच्या मागच्या रक्तवाहिन्यांमध्ये १२ तासांपर्यंत केली पाहिजे. काही विशिष्ट परिस्थितींमध्ये ते २४ तासांपर्यंत केले जाऊ शकते. या प्रक्रियेचा अर्थ रिकॅनलायझेशन म्हणतात. यात सामान्य रक्त प्रवाह पुनर्संचयित करणे जे मांडीचा सांधा किंवा मनगटाच्या धमन्यांद्वारे केले जाते.



- शस्त्रक्रियेचा परिणाम होतो तात्काळ : या प्रक्रियेदरम्यान एस्पिरेशन कॅथेटर किंवा स्टेंट रिट्रीव्हर किंवा काहीवेळा दोन्ही अडथळ्यांच्या ठिकाणी प्रगत केले जातात. स्टेंट गुठळ्याच्या पुढे जातो की नाही हे तपासण्यासाठी, गुठळी साफ करते आणि रक्त प्रवाह पुन्हा सुरू होतो का हे तपासण्यासाठी एक्स-रे इमेजिंग वापरली जाते. एखाद्या कुशल तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी रुग्णालये सुसज्ज असावीत. या शस्त्रक्रियेचा परिणाम तात्काळ होतो आणि अनेक रुग्णांना या प्रक्रियेनंतर अपंगत्वाचा सामना करावा लागत नाही.

## काय सांगता... एकातच १० व्यायामांइतके फायदे!

**व्यायाम हा केवळ शरीर तंदुरुस्त ठेवण्यासाठीच नाही तर अनेक घातक आजारांपासून शरीराला दूर ठेवण्यासाठीही आवश्यक आहे. पण प्रत्येक अवयवासाठी जसे की छाती, हात, पाठ, कोर, पाय इत्यादींसाठी वेगवेगळे व्यायाम करावे लागते. जे खूप कंटाळवाणे आणि थकवा आणणारे असते. पण तुम्ही माऊंटन क्लाईंबरबाबत ऐकले आहे का? हा शारीरिक वजनाचा किंवा बॉडीवेट व्यायाम आहे, ज्यासाठी कोणत्याही साधनांची किंवा मशीनची आवश्यकता नसते. तुम्ही ते घरच्या घरी अगदी सहज करू शकता आणि सर्वात मोठी गोष्ट म्हणजे असे केल्याने तुम्हाला १० व्यायामांइतके फायदे एकाचवेळी मिळतात.**



#### माऊंटन क्लाईंबर करण्याची पद्धत

सर्वप्रथम प्लँक एक्सरसाईजच्या स्थितीत येऊन आणि हात आणि पायांवर शरीराचा समान भार टाका. लक्षात ठेवा की तुमचे हात खांद्यांच्या समांतर जमिनीवर ठेवलेले असावेत आणि दोन्ही मनगट खांद्याच्या अगदी खालोखाल ठेवावेत. यासोबतच पाठ सरळ, पोटाचे स्नायू घट्ट आणि मान सामान्य स्थितीत असावी. आता शक्य असेल तेवढा उजवा गुडघा छातीच्या दिशेने आणा. हा पाय पुन्हा सुरुवातीच्या स्थितीत घेऊन डावा गुडघा छातीच्या दिशेने आणा. या प्रक्रियेला जास्तीत जास्त वेळ एकदम वेगाने करण्याचा प्रयत्न करा. संपूर्ण व्यायामा दरम्यान श्वासोच्छ्वास व्यवस्थित घेत राहा.

#### खूप मजेशीर आहे माऊंटन क्लाईंबर



माऊंटन क्लाईंबर्स हा एक व्यायाम आहे जो कार्डिओ आणि कोर वर्कआउट्स एकत्र करतो. त्यात विविधता आणून स्ट्रेंथ ट्रेनिंगही करता येते. हा व्यायाम करण्यासाठी हात व पाय तुम्हाला जमिनीवरच अशा पद्धतीने हलवावे लागतात जसे की तुम्ही एखाद्या डोंगरावर चढत आहात.

#### वयाच्या तिशीनंतर खूप गरजेचं...

या शारीरिक व्यायामाचा परिणाम महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर दिसून आला. फिटनेस वाढवण्यासाठी हे अत्यंत फायदेशीर असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे वयाच्या ३० व्या वर्षांपर्यंत स्टॅमिना आणि फिटनेस टिकवण्यासाठी हा व्यायाम रोज करा. तसे, वयाच्या ३० नंतरही ते चालू ठेवले पाहिजे.

#### १० एक्सरसाईजचे फायदे एकाचवेळी

हा एक व्यायाम तुम्हाला 10 व्यायामांइतके फायदे एकाचवेळी मिळवून देऊ शकतो. जसे की, स्टॅमिना वाढवतो, वजन कमी होते, पोटाची चरबी निघून जाते, हात मजबूत होतात, खांद्यांची ताकद वाढते, पायाची ताकद वाढते, हृदय चांगले कार्य करते, फुफ्फुसाची ऑक्सिजन वाहून नेण्याची क्षमता वाढते, छातीचे स्नायू वाढतात, क्वॉड्स मसल्स स्ट्राँग बनतात.

## शॉर्ट न्यूज

### धर्मासाठी हिंदू बांधवांनी एकत्र येण्याची गरज

**नेवासा :** महंत रामगिरी महाराज यांच्या समर्थनार्थ तसेच बांगला देशामध्ये हिंदू समाजावर झालेल्या अन्यायाच्या निषेधार्थ कालीपुत्र कालीचरण महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये श्रीराम मंदिर चौक येथे समस्त वारकरी सांप्रदाय, हिंदू रक्षा कृती समिती, श्रीरामपूर यांच्यावतीने धर्मसभेचे आयोजन करण्यात आले होते. ईश्वरास प्राप्त करून देण्याचे साधन म्हणजे धर्म होय. धर्मासाठी प्रत्येक हिंदुने एकत्र येण्याची गरज असल्याचे आवाहन कालीपुत्र कालीचरण महाराज यांनी उपस्थितांना केले. हिंदू समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता.

### रश्मी शिंदे झाली मिस इंडिया इंटरनॅशनल

**श्रीरामपूर :** दिल्ली येथे नुकत्याच पार पडलेल्या डिवाइन ग्रुपने आयोजित केलेल्या मिस डी वाईन ब्यूटी २०२४ च्या प्रतिष्ठित मिस इंडिया इंटरनॅशनल स्पर्धेत श्रीरामपूरच्या कु. रश्मी प्रेरणा राजीव शिंदे हिने विजयाची पताका रोवली आहे. या कामगिरीमुळे तिला जपानची राजधानी टोकियो याठिकाणी दि. १२ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मिस इंटरनॅशनल या आंतरराष्ट्रीय सौंदर्य स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा बहुमान मिळाला आहे. मिस इंटरनॅशनल ही जगातील सर्वांत जुनी व प्रतिष्ठित अशी सौंदर्य स्पर्धा असून तिचे मुख्यालय टोकियो याठिकाणी आहे.

### जोहरापुरातील दारू बंदीसाठी महिला आक्रमक

**शेवगाव :** तालुक्यातील जोहरापूर येथील अवैध दारू विक्री बंद करण्याबाबत शेवगाव पोलीस ठाण्याकडे अनेकवेळा मागणी करूनही पोलिसांनी डोळेझाक केल्याने गावातील महिलांनी बेट खासदार निलेश लंके यांना गावातील अवैध दारू विक्री बंद करण्याबाबत लक्ष घालण्याची मागणी केली आहे. या मागणीनंतर खासदार लंके यांनी थेट जिल्हा पोलीस अधीक्षक यांनाच पत्र देऊन १५ दिवसांत जोहरापूर येथील अवैध दारू विक्री बंद झाली नाही तर गावातील महिलांसह पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर उपोषण आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

### संगमनेरला २ पोलीस अधिकाऱ्यांची प्रतीक्षा

**संगमनेर :** शहर पोलीस ठाण्याचे विद्यमान पोलीस निरीक्षक बापूसाहेब महाजन यांनी संगमनेरचा पदभार स्वीकारल्यानंतर काही दिवसांतच बढतीवर नाशिक येथे बदली झाली आहे. बदली होऊनही अद्याप नवीन अधिकारी मिळालेले नाही. तर संगमनेर भागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सोमनाथ वाघचौरे यांचीही बढती मिळून बदली झालेली आहे.

# धर्म आणि जातीच्या नावावर विष कालवणे सहन करणार नाही

## ■ डॉ. सुजय विखे यांचा सज्जड इशारा ■ आश्वी बुद्रुक येथे युवक कार्यकर्त्यांशी साधला संवाद

**आश्वी : प्रतिनिधी**

**मागील ७० वर्षात शिर्डी मतदारसंघातील कोणत्याही जाती अथवा धर्माला संरक्षणाची गरज पडली नाही. मात्र आज असं काय झालं की? प्रत्येकाला आपलं अस्तित्व धोक्यात वाटू लागलं आहे. महाराष्ट्र आणि शिर्डी मतदारसंघाबाहेर काय चालू आहे, त्याबद्दल मला काही माहित नाही. परंतु शिर्डी मतदारसंघात आपण सर्व जण एक आहोत. त्यामुळे धर्म आणि जातीच्या नावावर विष कालवणे सहन करणार नसल्याचा इशारा डॉ. सुजय विखे पाटील यांनी दिला.**



संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक येथे युवक कार्यकर्त्यांशी संवाद साधताना माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील बोलत होते. अशोकराव जऱ्हाड, नवनाथ ताजणे, भीमा शिंदे, अनिल कंगणकर, विजय म्हसे, अनिल म्हसे, संजय गायकवाड, सुनील जऱ्हाड, अनिल जऱ्हाड, विशाल वाकचौरे, महेंद्र जऱ्हाड, भाऊसाहेब खेमनर, सतीश म्हसे, प्रवीण गायकवाड, शरद चंद, गणेश जऱ्हाड, आनंद बालोटे, सुभाष होडगर, राजेंद्र होडगर, विशाल जऱ्हाड, प्रमोद जऱ्हाड, संपत भुसाळ आदिंसह मोठ्या प्रमाणात युवक कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

डॉ. विखे पाटील पुढे म्हणाले की, ज्या दारुड्याला घरात आणि गावात कोणी विचारत नाही. तो मोबाईलवर एखादे स्टेटस ठेवतो आणि आपण गाव बंद ठेवतो. आपण सुशिक्षीत असूनही भरकटत चाललोय का? तुमचां शिक्षण घेऊन काय उपयोग झाला असा सवाल डॉ. विखे यांनी उपस्थित करत डॉक्टर असून जर मी भेदभाव मिटवू शकलो नाही तर माझ्या शिक्षणाचा काय उपयोग असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यामुळे मतदारसंघातील सामाजिक सलोखा बिघडणार नाही आणि मुलीची सुरक्षितता भंग होणार नाही यांची दक्षता घेण्याचे आवाहन केले.

'जनसेवा युवा मंच ॲप'बाबत माहिती देताना ते म्हणाले की, या ॲपचा उपयोग युवकांचे संघटन, बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये युवकांना रोजगाराच्या संधी, विविध अर्ज तसेच गणेश मंडळाची नोंदणी करण्यासाठी प्रामुख्याने उपयोग होणार आहे. १५ सप्टेंबर पर्यत यांची नोंदणी पूर्ण करण्याचे आवाहन करताना नोंदणी करणारे युवक माझ्याबरोबर आयुष्यभर राहणार असल्याचे सांगितले. तसेच सर्व सामान्य जनतेच्या प्रश्नांनासाठी संघटनेत काम करणाऱ्या युवकांच्या पाठीशी ठामपणे उभे राहण्याची ग्वाही डॉ. विखे यांनी दिली.

एकाचं घरातील उध्दव ठाकरे आणि राज ठाकरे महाराष्ट्रात दोन वेगवेगळे पक्ष चालवत असल्याचे सांगून कार्यकर्त्यानी आता एकमेकांच्या तक्रारी करण्यात वेळ न घालवता विविध योजना घरा-घरापर्यत पोहचवाव्यात. जेष्ठ कार्यकर्त्यानी देखील मनाचा मोठेपणा दाखवून तरुण कार्यकर्त्याशी स्पर्धा न करण्याचा सल्ला दिला आहे.

स्व. बाळासाहेब विखे पाटील, इंदिरा गांधी, अटलबिहारी वाजपेयी आणि राजीव गांधी यांसारख्या दिग्गज नेत्यांना देखील पराभवाचा सामना करावा लागला होता. मात्र आश्वी बुद्रुक येथे माझा पराभव झाल्याचा जल्लोष करण्यात आला. याची खंत बोलून दाखवताना मला काम करण्यासाठी कोणत्याही पदाची गरज नसल्याचे डॉ. सुजय विखे म्हटले आहे.

# पुतळा उभारण्यासाठी जयदीप आपटेला किती लाख रुपये मिळाले?

## जयंत पाटील यांनी सांगितला आकडा

**मुंबई : प्रतिनिधी**

**"आमची माफी मागा ही मागणी नव्हतीच. हा भ्रष्टाचार झालेला आहे. महाराजांचा पुतळा कोसळला. महाराष्ट्राचा स्वाभिमान कोसळला. त्याचं प्रायश्चित सरकारने घेतलं पाहिजे असं आमचं म्हणणं होतं. आता हे माफी मागत फिरत आहेत. पण महाराष्ट्र त्यांना माफ करणार नाही"**

"शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या निमित्ताने हे सरकार प्रत्येक गोष्टीत भ्रष्टाचार करतंय हे सिद्ध झालंय. रस्ते, पूल आणि सर्व मोठ्या प्रकल्पात भ्रष्टाचार होत आहे. मालवणमध्ये पुतळा झाला. शिल्पकाराचा अनुभव नव्हता तरीही त्याला पैसे दिले. त्याला फक्त २६ लाख मिळाले. बाकीचे पैसे कुठे गेले? त्याची चौकशी झाली पाहिजे. आपटे सामान्य माणूस असेल. तोही पोलिसांपासून लपू शकतो. पोलिसांना चकवा देऊ शकतो. तो सराईत गुन्हेगार नाही" असं जयंत पाटील म्हणाले. टीव्ही ९ मराठीच्या 'महाराष्ट्राचा महासंकल्प' कार्यक्रमात ते बोलत होते.



"कायदा आणि सुव्यवस्था किती ढासळली असेल. ढासळली म्हणणं चुकीचं ठरेल. ती शून्य झाली. बदलापूरची घटना पाहा. नागपूरमध्ये पोलीस स्टेशनमध्ये पोलीस जुगार खेळत होते. वचक राहिला नाही. सरकारने नैतिकता गमावली आहे. सर्व विभागात पोस्टिंग देताना कशी होते ते जगजाहीर आहे. त्यामुळे नैतिकता राहिली नाही. पारदर्शकता नाही. धमकी दिली जात आहे. अधिकाऱ्यांना धमक्या दिल्या जात आहेत" असा आरोप जयंत पाटील यांनी केला.

'महाराष्ट्राचा स्वाभिमान कोसळला'

"आमची माफी मागा ही मागणी नव्हतीच. हा भ्रष्टाचार झालेला आहे. महाराजांचा पुतळा कोसळला. महाराष्ट्राचा स्वाभिमान कोसळला. त्याचं प्रायश्चित सरकारने घेतलं पाहिजे असं आमचं म्हणणं होतं. आता हे माफी मागत फिरत आहेत. पण महाराष्ट्र त्यांना माफ करणार नाही" असा दावा जयंत पाटील यांनी केला.

'माफी मागावी ही आमची कधीच मागणी नव्हती'

"राज्यातील जनता सर्व गोष्टी सहन करेल, पण महाराजांचा पुतळा पडणं कधीच सहन करणार नाही.

## वाचकांच्या लेखणीतून

### नारधम?

हल्ली मराठी, गुजराती, हिंदी अशा प्रांतिक भाषांचे काय होणार असा प्रश्न उभा ठाकलेला आहे. इंग्रजी शिक्षण किंवा पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव ही कारणे त्यापाठी आहेत. यात वाद नाही. ही झाली एक बाजू.

याची दुसरीही बाजू विचारात घेऊ. आपल्या मराठी भाषेपुरताच विचार करू.

मराठी माध्यमातून शिकलेल्या ज्येष्ठ नागरिक असलेल्या मराठी माणसाचे उदाहरण पहा.

आम्ही ज्येष्ठ नागरिक मित्रमंडळी संध्याकाळी कट्ट्यावर गप्पा मारीत बसलो होतो. एका मित्राने नुकत्याच बदलापूरला घडलेल्या घटनेच्या गुन्हेगाराबद्दल नारधम असे विशेषण वापरले. मी डोके खाजवू लागलो. नारधम? माझ्यासारखेच गोंधळलेल्या दुसऱ्या मित्राने सदर ज्येष्ठ नागरिक मित्राला विचारले, तुम्हाला नराधम म्हणायचंय का? तो ज्येष्ठ नागरिक मित्र घसरता होकार देऊन थोडा वेळ अंतर्मुख झाला!



आपल्या मराठी भाषेत नाकी नऊ येणे असा एक वाक्प्रचार आहे. हल्लीची इंग्रजी माध्यमातलीच नव्हे; तर मराठी माध्यमातील मुलेही हा वाक्प्रचार माझ्या नाकातून नऊ आले! असा उच्चारतात.

हल्लीचे पालक आपल्या पाल्यांना काय शिकवीत असतील? माझ्या डोळ्यांसमोर तर अंधाऱ्याच येतात!

आपल्याला आपलीच मातृभाषा नीट येत नाही. त्यांनी आपली मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये का पाठवावीत? घोड्याला खरारा करायचे काम सोडून एखाद्याने तडक घोड्यावर स्वार होऊन भरधाव निघावे किंवा घरका ना घाटका म्हणतात तशीच गत म्हणायची ही!

■ **नाना ढवळे**

८२८६९१३२२३

**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

### जामगावकरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार!

करणारी विहीरही तुडुंब भरली आहे. त्यामुळे जामगावकरांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आता कायमस्वरूपी सुटणार असल्याने ग्रामस्थ वर्गातही आनंदाचे वातावरण आहे. केवळ पिण्याच्या पाण्याचा नाही तर जामगावसह सारोळा अडवाई ,दैठणे गुंजाळ येथील शेतीलाही काही प्रमाणात याचा फायदा होणार आहे.बिरोबाचा तलाव भरल्याने पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटणार असल्याने जामगावकरांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.तलाव तुडूंब भरल्याने सांडव्यावाटे पाणी वाहू लागले आहे. सांडव्यातून पाणी निघाल्यानंतर या तलावाचे सरपंच पुष्पाताई माळी यांच्या हस्ते जलपूजन करण्यात आले. यावेळी उपसरपंच शितलताई भुजबळ ,बाळासाहेब माळी,बबन मेहेर , पांडूशेठ हिलाळ, दगडू खाडे ,डी.एन.घावटे, दिनकर सोबले ,मनोज शिंदे, आप्पा मेहेर, सचिन केदार,दत्तामहाराज घोडे, ग्रामविकास अधिकारी श्री शेलार उपस्थित होते.

### माता - भगिनींनो तुमच्यासाठी भविष्यकाळ उज्ज्वल!

आपण सर्वांनी अनुभवला आहे, त्यामुळे सर्व लाडक्या बहिणींनी उद्याच्या काळात तुमच्या सक्षमीकरणासाठी खऱ्या अर्थाने प्रयत्न करणाऱ्या महायुतीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले पाहिजे अशी भावनिक साद घालत आवाहनही त्यांनी यावेळी केले. अभीष्टचिंतन सप्ताहाची सांगता टाकळी ढोकेश्वर येथील खेळ पैठणीचा या कार्यक्रमाने झाली. तालुकाभरात झालेल्या कार्यक्रमांच्या तुलनेत महिला भगिनींनी उच्चांकी गर्दी केली होती. आकाश फल्ले यांनी प्रस्तुत खेळ पैठणीचा ह्या कार्यक्रमा दरम्यान अक्षरशः महिला भगीणींसह उपस्थित सर्वजण अगदी खळखळून हसत होते. निर्विवाद उडणारा हास्यकल्लोळ, साडेतीनशेहून अधिक पैठण्या व वेगवेगळ्या बक्षिसांची लयलूट, भान हरपून आनंद लुटणाऱ्या माता-भगिनी आणि कोरडे यांच्यावर असलेला प्रचंड विश्वास या सगळ्यामुळे वातावरण भारावून गेले होते.

### काँग्रेस सरकार आल्यास 3 हजार रुपयांची महालक्ष्मी योजना

घोषणा केली आहे. एका वृत्तवाहिनीच्या कार्यक्रमांमध्ये नाना पटोले यांनी काँग्रेसच्या वतीने या नव्या योजनेची घोषणा केली आहे. इतकेच नाही तर आमच्या सरकारच्या या योजनेमध्ये दरवर्षी एक हजार रुपयांची वाढ करणार असल्याची घोषणा देखील नाना पटोले यांनी केली आहे.

**हांडे डी.पी.**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**पारनेर तालुका सहकारी पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या पारनेर अ.नगर, ता.नगर,जि.अ.नगर**

जा.क्र. /लिलाव/धनसंपदा पतसंस्था/ — दिनांक ०२/०९/२०२४

**स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव**

ज्या अर्थी धनसंपदा **ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या सुपा (वाळवणे)** ता.पारनेर,जि.अ.नगर यांचे खालील नमुद थकबाकीदारांकडील पतसंस्थेच्या थकबाकी वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ /९१ अन्वये मिळवलेल्या वसुली दाखल्यांची अंमलबजावणी पतसंस्थेच्या खालील थकबाकीदांच्या स्थावर मिळकती/मालमत्ता जप्त केलेल्या आहेत सदर जप्त केलेल्या मालमत्तेचा जाहीर लिलाव करण्यात येत आहे. ज्या इच्छुक खरेदी दारांना लिलावात भाग घ्यावयाचा असेल त्यांनी लिलावाच्या ठिकाणी दिलेल्या वेळेत उपस्थित राहावे

**जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा तपशील खालील प्रमाणे**

| अ.न. | कर्जदार / थकबाकीदाराचे नाव | गावाचे नाव | मालमत्ता जप्त केलेल्या धारकाचे नाव | गट नं. | क्षेत्र हे | क्षेत्र आर | बाजारभावाप्रमाणे मुल्यांकन शासकीय | बाजारभावा प्रमाणे | ठरवुन दिलेली अपसेट |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | रोहिदास उद्धव करंजुले(कर्जदार) | पाडळी रांजणगाव | रोहिदास उद्धव करंजुले(कर्जदार) | ३९४ | ० | २५ | २१७५००/- | २८१०००/- | २८१०००/- |
| २ | कणसे राजेंद्र दशरथ(कर्जदार) | कडुस | कणसे राजेंद्र दशरथ(कर्जदार) | ६० | ० | ४० | २३१२००/- | ४५००००/- | ४५००००/- |
| ३ | दत्तात्रय सुभाष उबाळे(कर्जदार) | पाडळी रांजणगाव | दत्तात्रय सुभाष उबाळे(कर्जदार) | ६८३<br>पो.ख | ०<br>० | ६७<br>१० | ५७७५००/- | ८६६०००/- | ८६६०००/- |
| ४ | रावडे दत्तात्रय आनंदा(कर्जदार) | कडुस | आनंदा लक्ष्मण रावडे(जामीनदार) | ३५ | १ | ०.८ | ७२७९२०/- | १०८००००/- | १०८००००/- |
| ५ | भाऊसाहेब शंकर करंजुले (कर्जदार) | पाडळी रांजणगाव | भाऊसाहेब शंकर करंजुले (कर्जदार) | २७६<br>पो.ख | ०<br>० | ९८<br>०.५०० | ४७२५००/- | १००५०००/- | १००५०००/- |
| ६ | शहाजी त्रिबंक दिवटे(कर्जदार) | कडुस | शहाजी त्रिबंक दिवटे (कर्जदार) | १४२ | ० | ७० | ४०८९३५/- | ७८८०००/- | ७८८०००/- |

**चतु सिमा मुळ नकाशाप्रमाणे**

**लिलावाचे ठिकाण - सुपा (संस्था कार्यालय) दि.०१/१०/२०२४ वेळ सकाळी १०.०० वाजता**

आदेश प्रसिद्ध झाल्या पासुन दिनांक ०१/१०/२०२४ च्या आत वसुलपात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरील प्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व पतसंस्थेस येणे असलेल्या वसुल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल.

वर नमुद केलेल्या थकबाकीदारांनी लिलावाचे तारखेपुर्वी संपुर्ण कर्ज रक्कम भरणा केल्यास सदर लिलाव रद्द करण्यात येईल.लिलावाच्या अटी व शर्ती कार्यलयीन वेळेत व लिलावाच्या ठिकाणी पहावयास मिळतील.कोणतेही कारण न देता लिलाव तहकुब अथवा रद्द करण्याचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांना राखुन ठेवलेला आहे.

लिलाव नं.१ कोणीही न घेतल्यास लिलाव नं.२ दि.३०/१०/२०२४ रोजी व तो लिलाव कोणीही न घेतल्यास नं.३ दि.२९/११/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता टाकळी ढोकेश्वर पतसंस्थेच्या कार्यालयात करण्यात येईल

सील

ठिकाण :- सुपा (वाळवणे)
दिनांक :- ०२/०९/२०२४

सही/-
हांडे डी.पी.
विशेष वसुली व विक्री अधिकारी
पारनेर तालुका सहकारी पतसंस्थाचे सहकारी फेडरेशन मर्या पारनेर,ता.पारनेर जि.अ.नगर

*टिप - सदर जाहिर प्रसिद्धीत काही टायपिंग चुक झाल्यास ती दुरूस्ती करून परत जाहिर प्रसिद्ध न करता संस्थेच्या नोटिस बोर्ड वर प्रसिद्ध करण्यात येईल*

**अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशन मर्या.,अहमदनगर**
मुख्य कार्यालयः- महात्मा फुले चौक, मार्केट यार्ड,उपनिबंधक, ता.नगर कार्यालयाशेजारी, अहमदनगर. ✆:०२४१-२३२६९१४
E-Mail : dist_fed@rediffmail.com

जा. क्र. पतसंस्था फेडरेशन /५९७/ सन२०२४ — दिनांक : २१/०८/२०२४

**स्थावर मालमत्ता जप्ती हुकूम**

ज्या अर्थी **धनसंपदा ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या.,वाळवणे,ता.पारनेर ,जि.अहमदनगर** यांनी खाली नमुद केलेल्या थकबाकीदारांविरुध्द महाराष्ट्र सह.संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१/९८ ब अन्वये वसुली दाखले मिळविले असुन त्यांच्यावर रितसर मागणी नोटीस बजावली आहे.तरीही त्यांनी त्यांच्याकडील थकबाकीची रक्कम भरली नसल्याने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७/(१०) नुसार मला मा. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था अहमदनगर यांनी प्रदान केलेल्या अधिकारास अनुसरुन मी **बी.पी.पवार** विशेष वसुली व विक्री अधिकारी खालील नमुद स्थावर मालमत्ता थकीत येणे रक्कम वसुलीकरिता जप्त करीत आहे. आणि महाराष्ट्र सहकारीसंस्था अधिनियम १९६० चे कलम ९९ मधील तरतुदीनुसार वसुली दाखला दिल्यानंतर सदर स्थावर मालमत्तेचे कोणतेही खाजगी हस्तांतरण / दुसऱ्याच्या स्वाधीन करण्यात आलेली असेल किंवा विक्री अथवा तिच्यावर कोणताही भार,गहाण,दान देण्यात किंवा बोजा निर्माण करण्यात आला असेल, तर त्या सर्व बाबी पतसंस्थेच्या बाबतीत रद्द / निरर्थक ठरतील.

| अ.नं. | थकबाकीदाराचे नाव | गांव | स्थावर मिळकत: वसुली दा.रक्कम | गट नं./प्लॉट नं./मिळकत नं. | क्षेत्र हे. आर | आकार रु. पै | चतु:सिमा (पुर्व / पश्चिम / दक्षिण / उत्तर) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | कर्जदार - कोल्हे धोंडीभाऊ झुंबर यांची मिळकत व करिता | पिंपळगांव कौडा | २१८०२/- +इतरखर्च+ होणारे व्याज. | २४२ पैकी<br>मिळकत नं ४०५ | ०.५९पैकी<br>५२२चौमी | १.०२<br>- | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामिनदार - दळवी मोहन नामदेव यांची मिळकत | पिंपळगांव कौडा | | १२३ पैकी<br>१२३पैकी | ०.४०पैकी<br>०.६३पैकी | ०.३३<br>०.५३ | |
| | जामिनदार - जगताप शिवाजी बळवंत यांची मिळकत | पिंपळगांव कौडा | | २८०<br>३४५<br>३५९<br>३६१ | १.६५<br>२.६९<br>३.४४<br>०.४४ | २.०४<br>१.३८<br>३.८९<br>०.५९ | |
| | संमतीदार - कोल्हे लक्ष्मीबाई झुंबर यांची मिळकत | पिंपळगांव कौडा ता.अहमदनगर | | २४२ | ०.५४.५१<br>[पो.ख ०.३२.७५] | ०.९४ | |
| २ | कर्जदार - भिसे कारभारी बाबुराव यांची मिळकत व करिता | पारनेर | ४४२३२/-- +इतरखर्च+ होणारे व्याज. | ३८५५<br>४०१४<br>४०९१ | ०.०२<br>०.०९.५०<br>०.६२.०० | ०.०१<br>०.२७<br>०.४२ | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामिनदार - औटी राजेंद्र मारुती यांची मिळकत | पारनेर ता.पारनेर | | १०४पैकी | ०.६०पैकी | १.०१ | |
| | जामिनदार -भिसे विष्णु कारभारी | | | | | | |
| ३ | कर्जदार - ढवळे राजेंद्र पांडुरंग यांची मिळकत व करिता | वाळवणे | ५११८९८/-- +इतरखर्च+ होणारे व्याज. | मालमत्ता क्रं ०१००/A अर्धे पक्के घर [ दगड विटांचे मातीचे घर द.मा.बांधकाम पहिला मजला ]<br>मिळकत नं १०० अ | २५.५६चौमी<br>४९.१३चौमी | -<br>१४४ | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामिनदार - डॉ.जाधव तुकाराम विठठल यांची मिळकत | रुई छत्रपती | | ३६५ पैकी | ०.६१ पैकी | १.३१ | |
| | जामिनदार - थोरात सुरेश बाळासाहेब यांची मिळकत | वाळवणे ता.पारनेर | | २८०<br>२८० पैकी<br>२८० पैकी | ०.२०<br>०.०३पैकी<br>९५.०० पैकी | ०.८९<br>०.१७<br>- | |
| ४ | कर्जदार - कोल्हे ज्ञानदेव झुंबर यांची मिळकत व करिता | पिंपळगांव कौडा | ३३१२०/-- +इतरखर्च+ होणारे व्याज. | २४२<br>मि.नं ४०५ | ०.५९<br>५२२चौमी | १.०२<br>- | मुळ नकाशा प्रमाणे |
| | जामिनदार - दळवी मोहन नामदेव यांची मिळकत | पिंपळगांव कौडा | | १२३ | ०.६३ | ०.५३ | |
| | जामिनदार -जगताप शिवाजी बळवंत यांची मिळकत | पिंपळगांव कौडा | | २८०<br>३४५<br>३५९<br>३६१ | १.६५<br>२.६९<br>३.४४<br>०.४४ | २.०४<br>१.३८<br>३.८९<br>०.५९ | |
| | संमतीदार - कोल्हे लक्ष्मीबाई झुंबर यांची मिळकत | पिंपळगांव कौडा ता.अहमदनगर | | २४२ | ०.५४.५१ | ०.९४ | |

हा आदेश प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत वसुल पात्र रक्कम व त्यावरील येणे व्याज न भरल्यास वरीलप्रमाणे जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेचा जाहिर लिलाव करण्यात येईल व पतसंस्थेस येणे असलेल्या वसुल पात्र रक्कमेचा भरणा केला जाईल. वरील स्थावर जाहिर लिलावाने विक्री करुन ही वसुल पात्र रक्कमेएवढी रक्कम न आल्यास जामिनदारांकडुन वरील प्रमाणेच प्राधान्याने वसुली केली जाईल,याची जामिनदाराने नोंद घ्यावी.

स्थळ :- अहमदनगर
दिनांक - २१/०८/२०२४

विशेष वसुली व विक्री अधिकारी

-सही-
( बी.पी.पवार )
विशेष वसुली व विक्री अधिकारी
अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सह.फेडरेशन मर्या,अ.नगर

सुरभि हॉस्पिटल, अहमदनगर येथील
स्त्रीरोग तज्ज्ञ आपल्या परिसरामध्ये
प्रत्येक बुधवारी भाळवणी येथे वेळ 10 ते दुपारी 2



डॉ. सुलभा पवार
एम.बी.बी.एस. (बी.जे. पुणे), डि.जी.ओ. (मुंबई)
स्त्री आरोग्य तज्ज्ञ

● प्रसूती विभाग
- प्रसूती पूर्व तपासणी
- संपूर्ण प्रसूती उपचार
- अति जोखमेचे बाळंतपण (High Risk Pregnancy)

● गर्भपिशवीचे आजार
- अंगावरून पांढरे किंवा लाल जाणे
- गर्भपिशवी मध्ये असणाऱ्या गाठी
- गर्भपिशवीच्या मुखांचे आजार

● Infertility वंधत्व उपचार
- वारंवार होणारे गर्भपात,
- लग्नानंतर अनेक वर्ष गर्भधारणा न होणे,
- पहिल्या गर्भधारणेनंतर दुसऱ्या गर्भधारणेला अडचण येणे,
- टेस्ट ट्यूब बेबी (IVF) किंवा IUI उपचार

● स्तनांचे आजार आणि उपचार
● PCOS आणि मासिक पाळीच्या समस्या
● सरकारमान्य गर्भपात आणि कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया

सर्व शस्त्रक्रिया ॲडव्हान्स लॅप्रोस्कोपी सर्जरीद्वारे
(म्हणजेच बिन टाक्याच्या आणि दुर्बिणीच्या)

पत्ता: डॉ. मते यांचे नित्यसेवा हॉस्पिटल, भाळवणी, ता. पारनेर
नाव नोंदणीसाठी संपर्क: 9545257575, 7030939211

नोंदणी क्र. महा. ३९६/२२
जय नेताजी मल्टीपर्पज एज्युकेशन ट्रस्ट, संचलीत
न्यु सह्याद्री अकॅडमी
स्वप्न तुमचे मार्गदर्शन आमचे
मुला-मुलींसाठी राहण्याची व जेवणाची उत्तम व्यवस्था
एकदा या बघा खात्री करा व मगच प्रवेश घ्या...!
आर्मी / पोलीस भरती व सरळ सेवा परीक्षेतील भरघोस यशा नंतर MPSC च्या क्षेत्रात दमदार पदार्पण
MPSC FOUNDATION COURSE
PSI | STI | ASO | TAX ASST |
MPSC लिपीक
NEW BATCH STARTING
ADMISSION OPEN
निवासी/अनिवासीची सोय
स्वतंत्र मुलींची बॅच



मेजर भगवान नांगरे सर

✻ आमची वैशिष्ट्ये ✻
✻ १ डिसेंबर पासुन नवीन बॅचला सुरुवात
✻ एकदम डिजीटल पद्धतीने लेक्चर हॉल
✻ प्रत्येक विषयाला अनुभवी शिक्षक
✻ मुलींसाठी व मुलांसाठी स्वतंत्र होस्टेल व मेस सुविधा
✻ अत्याधुनिक व सुसज्य अशी अभ्यासिका
✻ PSI या पदासाठी स्वतंत्रपणे ग्राऊंडची व्यवस्था
✻ पहिले ५ दिवस फ्रि डेमो लेक्चर
✻ ॲडमिशन ओपन ✻
9850046500 | 9834935396 | 9822821095
आमचा पत्ता : स्टारलाईट कंपनी समोर, बडोदा बँक शेजारी, बजाजनगर, छत्रपती संभाजीनगर

# मानवतावाद हाच खरा शिक्षकांचा नीती आदर्श

## प्रा. अर्जुन चाटे यांचे प्रतिपादन



**अळकुटी : प्रतिनिधी**

**डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् हे आदर्श शिक्षकाबरोबरच मानवतेचे महान पुजारी होते म्हणूनच मानवतावाद हाच खरा शिक्षकांचा नीतीआदर्श आहे असे प्रतिपादन महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. अर्जुन चाटे यांनी केले.**

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अळकुटी येथे डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंती व शिक्षकदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी प्रा. अर्जुन चाटे अध्यक्षस्थानावरुन बोलत होते.

प्रा. रावसाहेब झावरे, प्रा. शिवाजी शेळके, प्रा. संजय जाधव तसेच विद्यार्थी वैष्णवी गुळवे, साक्षी पारखे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी पर्यावरण पूरक शाडू मातीच्या गणेश मूर्ती बनविण्याची कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेने प्रेरित होऊन अनेक विद्यार्थ्यांनी पर्यावरणपूरक शाडू मातीच्या सुबक गणेशमूर्ती तयार केल्या.

प्रा. चाटे पुढे म्हणाले की,ऐतिहासिक काळापासून गुरुशिष्य परंपरा सुरु आहे. शिक्षक हा आपला आई व पित्यानंतर प्रमुख गुरू असतो. अगदी पहिलीपासून ते पदव्युत्तर किंवा अगदी नोकरीस वा व्यवसायात आपले स्थान घट्ट करेपर्यंत तर कधी आपल्या शेवटच्या श्वासापर्यंत शिक्षक हा विद्यार्थी घडविण्यासाठी अहोरात्र झटत असतो. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी शिक्षक ते राष्ट्रपती असा दीर्घ अनुभव संपादन करत भारतास दिशा देण्याचे काम केले आहे त्यांचा जन्मदिन हा शिक्षकदिन म्हणून साजरा होतो हा त्यांचा आजच्या पिढीकडून केला जाणारा सन्मान आहे. असेही ते म्हणाले.

याप्रसंगी प्रा. विशाल रोकडे, प्रा. शर्मिष्ठा बोरुडे, डॉ. कुंदा कवडे, प्रा. दत्तात्रय शेळके, प्रा. दशरथ पानमंद, प्रा. प्रियांका दिवटे, प्रा. सुनिता जाधव, प्रा. पोपट सुंबरे, प्रा. विनायक सोनवणे, प्रा. मच्छिन्द्र बेलोटे, प्रा. संदीप गेटम, प्रा. मोहन माने, प्रा. सचिन बलसाने, प्रा. सुषमा करकंडे, प्रा. ऋषिकेश गिते, प्रा. सुप्रिया पारखे, प्रा. अमोल नालकर, प्रा. पूजा वैरागर, प्रा. पांडुरंग उघडे, प्रा. अनुराधा गाढवे, प्रा. राजाराम गोर्डे, सूर्यमाला भोर, श्री. गोरख घोलप, सुनिता भालेराव, नितीन घोलप, विकास सोनवणे, छाया म्हस्के, राहुल बोरुडे, सागर शितोळे, मनोहर कनिंगध्वज, मच्छिन्द्र म्हस्कुले, रवींद्र वाघ, वैजनाथ आवारी, शिवाजी कळंबे, पांडुरंग शिरोळे तसेच सर्व प्राध्यापक प्राध्यापकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.स्वाती फापाळे यांनी प्रास्ताविक केले तर डॉ. शांताबाई थोरात यांनी आभार मानले.

# खडकवाडीच्या उपसरपंचपदी अर्चना गागरे

## गावचा सर्वांगिण साधण्याची ग्वाही । निवडीनंतर समर्थकांचा जल्लोष




**खडकवाडी : प्रतिनिधी**

**खडकवाडीचे उपसरपंच अक्षय ढोकळे यांनी पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर अर्चना गागरे यांची निवड करण्यात आली. निवडीनंतर समर्थक कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.**

उपसरपंचपदासाठी खडकवाडी येथे निवड प्रक्रिया पार पडली. खडकवाडी ग्रामपंचायतमध्ये एकूण १० सदस्य आहेत. निवड प्रक्रियेच्या वेळेस एकूण १० सदस्य उपस्थित होते. यावेळी उपसरपंच पदासाठी झालेल्या निवडणुकीमध्ये अर्चना शरद गागरे व धनंजय बाबासाहेब ढोकळे यांच्यात लढत होऊन अर्चना शरद गागरे या सहा मतांनी विजयी होऊन खडकवाडी गावच्या नवनिर्वाचित उपसरपंच झाल्या.

गागरे उपसरपंचपदी निवड झाल्यानंतर त्यांच्या समर्थकांनी गावामध्ये जल्लोष केला. निर्वाचित उपसरपंच अर्चना शरद गागरे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार व सन्मान करण्यात आला. निवडीनंतर बोलताना अर्चना गागरे यांची निवड झाल्यानंतर त्या म्हणाल्या की खडकवाडी हे ग्रामीण भागातील दुष्काळी पट्ट्यातील गाव, गावचा सर्वांगीण विकास करण्यासाठी यापुढील काळात प्रयत्न करणार असून गावातील ज्येष्ठ, युवक, युवती, महिला सर्वांना एकत्र करून गावच्या विकासामध्ये व गावाला नवीन ओळख निर्माण करून देण्यासाठी प्रयत्नशील आहे.

उपसरपंचपदी निवड झाल्याबद्दल अर्चना गागरे यांचे सरपंच शोभा शिंदे, ग्रा. पं. सदस्य श्रीरंग रोकडे, डॉ. रावसाहेब आग्रे, नवनाथ बिचारे, सुभाष ढोकळे, शिवाजी शिंगोटे, विश्वनाथ ढोकळे, बाबासाहेब गागरे, अंबादास गागरे, सुरेश गागरे, एल. आर. शिंदे, सुभाष शिंदे, भाऊसाहेब गागरे, अक्षय ढोकळे, कैलास आग्रे, विठ्ठल शिंदे, संतोष ढोकळे, शिवाजी आग्रे, माणिक रोहकले, विशाल गागरे, महाराष्ट्र राज्य पतसंस्था कर्मचारी संघटना तसेच खडकवाडी ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे.

### खडकवाडीत महिलाराज !

**खडकवाडी तालुक्याच्या उत्तर भागातील महत्त्वाची ग्रामपंचायत आज खडकवाडी एक नव्या दिशेने वाटचाल करत असून पारनेर तालुक्याच्या उत्तर भागातील मोठी बाजारपेठ होऊ पाहत आहे. खडकवाडी गावचा कारभार आता महिलांच्या हातात आला असून सरपंच शोभा शिंदे व उपसरपंच अर्चना गागरे या महिलांनी ग्रामपंचायतची सत्ता हातात घेतली आहे. त्यामुळे खडकवाडीत महिलाराज अवतरले आहे.**

# शिक्षक दिनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रेरणा

## ▪ सुभाष महाराज मगर यांचे मत
## ▪ स्वरांजली उनवणेच्या हस्ते प्रतिमापूजन



**निघोज : प्रतिनिधी**

**डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी शिक्षणाचा महामंत्र जगाला दिला असून शिक्षक दिनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळत असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे ज्येष्ठ शिक्षक सुभाष महाराज मगर यांनी व्यक्त केले आहे.**

निघोज येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती तसेच शिक्षक दिन साजरा करण्यात आला. यावेळी शिक्षिकेच्या भुमिकेत असलेल्या स्वरांजली रोहन उनवणे हिच्या हस्ते सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतीमेचे पुजन करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी शाळेच्या सहा विद्यार्थ्यांना शिक्षकाची भुमिकेत विद्यार्थ्यांना शिकवण्याचा सन्मान देऊन जिल्हा परिषद शाळेचे ज्येष्ठ शिक्षक काळे सर, काळोखे सर, दिघे मॅडम, सालके मॅडम यांच्या हस्ते सत्कार करुन सन्मानित करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्या भावना साळवे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रोहन उनवणे, स्वरांजली केक्स गृहउद्योगच्या अध्यक्षा सरला उनवणे तसेच विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मगर महाराज यावेळी म्हणाले शिक्षणाशिवाय जीवन अधुरे आहे. आजच्या युगात शिक्षणाचे महत्त्व वाढले असून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या माध्यमातून सर्वसामान्य विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण व शिक्षणाच्या माध्यमातून शासकीय योजनांचा लाभ सरकारच्या माध्यमातून मिळत आहे. सर्वपल्ली राधाकृष्णन यांनी जगाला शिक्षणाचा संदेश दिला हा आपल्या देशासाठी सर्वाधिक अभिमानाची बाब असून शिक्षक दिन हा विद्यार्थ्यांना प्रेरणादायी बाब असल्याचे प्रतिपादन त्यांनी व्यक्त केले आहे.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक काळे सर यांनी केले शेवटी दिघे मॅडम व सालके मॅडम यांनी आभार मानले.

# क्रांती शुगरचे पाच लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दीष्ट

## संचालक नरेंद्र दुर्वे यांची माहिती



**देवीभोयरे : प्रतिनिधी**

**देवीभोयरे येथील क्रांती शुगर साखर कारखान्याच्या यंदाच्या गळीत हंगामासाठी पाच लाख मेट्रिक टन गाळपाचे उद्दीष्ठ असल्याची माहिती कारखान्याचे संचालक नरेंद्र दुर्वे यांनी दिली.**

यंदाच्या गळीत हंगामासाठीच्या रोलर पूजनाचा कार्यक्रम कारखान्याच अध्यक्ष ज्ञानेश नवले यांच्या हस्ते बुधवारी संपन्न झाला. यावेळी संचालक दुर्वे हे बोलत होते.

यंदाच्या हंगामात कारखान्याचे ५ लाख मेट्रीक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट आहे. यासाठी लागणारी ऊस तोडणी, वाहतूक यंत्रणा, मशिनरी ओव्हरऑयलिंगसह दुरुस्तीची कामे युद्ध पातळीवर सुरू आहेत. अनेक अडथळ्यांवर मात करत कारखान्याची वाटचाल चालु आहे. येणारा गळीत हंगाम योग्य व नियोजनबद्ध पद्धतीने सर्व संचालक मंडळ व आपल्या सर्वांच्या सहकार्याने यशस्वीपणे पार पडेल, असा विश्वास कारखान्याचे संचालक नरेंद्र दुर्वे यांनी व्यक्त केला.

यावेळी कारखान्याचे संचालक, सर्व खाते प्रमुख,सर्व अधिकारी व कारखान्यांचे सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.

# डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन भारतीय संस्कृतीचे खरे पाईक

## डॉ. बी.एच.झावरे यांचे प्रतिपादन


( छाया : रोहन उनवणे, निघोज )

**निघोज : प्रतिनिधी**

**विद्यार्थी यशस्वी होतो तेव्हा शिक्षकाची खरी ओळख होते .शिक्षक दिन हा विद्यार्थ्यांना एक प्रेरणादिन असल्याचे प्रतिपादन न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहमदनगर या महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. बी. एच. झावरे यांनी व्यक्त केले आहे.**

श्री मुलिकादेवी महाविद्यालय, निघोज येथे सांस्कृतिक विभागाच्या वतीने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त शिक्षक दिन उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.झावरे उपस्थितांना मार्गदर्शन करताना बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सहदेव आहेर हे होते. या प्रसंगी कु. आकाश मस्के, कु. ज्ञानेश्वरी घोरपडे, कु. ऋतुजा रसाळ, कु. राजश्री पोखरणा, कु. मुक्ता वाजे, कु. सादिया शेख या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले तसेच प्रा. संगीता मांडगे यांनी आपल्या मनोगतातून गुरूंविषयीची आदराची भावना व्यक्त केली.प्रमुख मार्गदर्शक डॉ. बी. एच. झावरे यांनी विद्यार्थ्यांना डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचे जीवन व कार्य, शिक्षकांचे कर्तव्य, विद्यार्थ्यांचे दृष्टिकोन अशा विविध विषयावर सखोल मार्गदर्शन केले.

पुढे बोलताना डॉ.झावरे म्हणाले, रशियाचे दुसरे राजदूत डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन होते. तेव्हापासून भारत आणि रशिया या दोन देशांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध आहे. डॉ. राधाकृष्ण हे एक विद्यार्थी प्रिय शिक्षक होते. त्यांच्या जन्मदिवशी खरा शिक्षक दिन साजरा करायचा असेल तर आपण डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची पुस्तके, त्यांचे विचार वाचायला हवेत. ते खऱ्या अर्थाने भारतीय संस्कृतीचे पाईक होते. डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांची खूप वेळा नोबेल पारितोषिकसाठी शिफारस झाली परंतु एका शिक्षक झालेल्या राष्ट्रपतीला नोबेल पारितोषिक मिळाले नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु. श्रद्धा साळवे, सूत्रसंचालन कु. पूजा चौधरी, कु. प्राची कारखिले यांनी केले, तर विद्यार्थी उपप्राचार्य कु. शुभांगी पालवे यांनी आभारप्रदर्शन करून कार्यक्रमाची सांगता केली. या प्रसंगी डॉ. मनोहर एरंडे, प्रा. अश्विनी सुपेकर, प्रा. सचिन निघुट, डॉ. प्रवीण जाधव, प्रा. मनीषा गाडीलकर, प्रा. नुतन गायकवाड, डॉ. दुर्गा रायकर, प्रा. निलिमा घुले, प्रा. संगीता मांडगे, प्रा. वृषाली जगदाळे, प्रा. रूपाली गोरडे, प्रा. अमृता दौंडकर, प्रा. अपेक्षा लामखडे, प्रा. विकास पातकळ, प्रा. स्वाती पवार, प्रा. निकिता सुरोशे, प्रा. पुनम गंधाक्ते, प्रा. एस. बी. सालके, प्रा. हर्षदा पंडित, प्रा. सुनंदा गाडीलकर आदी प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दत्तात्रय वराळ यांचे निधन

**निघोज : प्रतिनिधी**



**निघोज येथील दत्तात्रय तुकाराम वराळ पाटील यांचे नुकतेच वयाच्या ५९ व्या वर्षी हृदयविकाराच्या तिव्र झटक्याने निधन झाले. वराळ हे मुंबई येथे व्यवसाय निमित्ताने कार्यरत होते.**

अतिशय मनमिळाऊ स्वभावाचे वराळ यांचा स्वभाव अतिशय नम्र होता. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, पुतणे, सुना असा मोठा परिवार आहे. मुंबई येथे नामांकित कंपनीत कार्यरत असणारे सुधीर वराळ व स्मिता निलेश लेंडे यांचे ते वडील होत. तसेच वराळ भावकीचे ज्येष्ठ कारभारी व माजी ग्रामपंचायत सदस्य भास्करराव वराळ, डॉ. राजाराम वराळ व भरत वराळ यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.

# जीवनात गुरुचे स्थान मोठे - सुजित झावरे पाटील

## पोद्दार स्कूलमध्ये शिक्षक दिन साजरा

**पारनेर : प्रतिनिधी**

**कुंभार जसा मातीच्या गोळ्याला आकार देतो तसेच गुरु आपल्या जीवनाला आकार देतात त्यामुळे जीवनात गुरुचे स्थान मोठे असल्याचे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांनी केले.**

डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त पारनेर येथील गुरुमाऊली पोद्दार स्कूलमध्ये शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी झावरे पाटील अध्यक्षस्थानावरून बोलत होते.देवकृपा फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक पॅडचे वाटप करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष रामराव गाडेकर यांनी शिक्षकांना शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या तर सचिव मच्छिंद्र मते यांनी उपस्थित आमचे स्वागत केले.

सुजित झावरे पाटील पुढे बोलताना म्हणाले की, विद्यार्थ्यांकडून आई-वडिलांच्या मोठ्या अपेक्षा असतात त्यादृष्टीने ते प्रयत्न करीत असतात. विद्यार्थ्यांनी उच्च ध्येय ठेवून अभ्यासाच्या माध्यमातून आई-वडिलांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचे आवाहन करीत झावरे पाटील यांनी आपल्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला.




पुणेवाडीचे माजी सरपंच बाळासाहेब रेपाळे , खजीनदार काशिनाथ फंड , विश्वस्त विकास दळवी,प्राचार्य विठ्ठल तुपे व शिक्षकवृंद उपस्थित होता.आऊंश पुजारी याने सुत्रसंचलन केले तर हर्षवर्धन मते याने आभार मानले.

रजि. नं. २०७६१ ॥ विना सहकार, नही उध्दार ॥ दि. १०/०८/१९५१

**निघोज विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.निघोज**
ता.पारनेर, जि.अहमदनगर

**७३ वी अधिमंडळ वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**
(फक्त सभासदांसाठी) दि. २६/०८/२०२४

निघोज विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित निघोज, ता.पारनेर, जि.अहमदनगर या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची सर्वसाधारण सभा मंगळवार दि.१०/९/२०२४ रोजी सकाळी ९ वा.स्थळ-वि.का.से.सो.कार्यालय येथे संस्थेचे चेअरमन श्री.सुनिल काशिनाथ वराळ यांच्या अध्यक्षतेखाली खालील विषयांवर चर्चा करणेसाठी आयोजित केलेले आहे तरी सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

सभेपुढील विषय

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभा दि.२१/०९/२०२३ रोजी चे सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. मा.संचालक मंडळाने तयार केलेल्या दि.३१/३/२०२४ अखेर संपलेल्या वर्षाचे ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मंजुरी देणे.
३. जनरल क.म.पत्रकांवर सह्या करण्याचा अधिकार संचालक मंडळास देणे.
४. मा.संचालक मंडळाने केलेल्या नफा विभागणीस मंजुरी देणे.
५. सन २०२३-२४ चा वैधानिक लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
६. सन २०२४-२५ सालाकरिता मा.सहकार आयुक्त व निबंधकांनी प्रमाणित केलेल्या पॅनल मधून वैधानिक लेखापरीक्षण करणेकामी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे व मेहनताना ठरविणे.
७. सन २०२२-२३ वर्षाच्या लेखापरीक्षणाचा दोषदुरुस्ती अहवाल व त्या वरील निबंधकाचे निर्देश सादर करणे.
८. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरिता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची आणि सन २०२३-२४ या वर्षाच्या अंदाजपत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चाची माहिती देणे व मान्यता घेणे
९. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७५(१) व पोटनियम ३२(९) मधील तरतुदीनुसार संचालकांना व त्यांच्या कुटुंबीयांना दिलेली कर्ज वसुली पत्रकाची नोंद घेणे.
१०. सभासदांना सहकार शिक्षण व प्रशिक्षण देणे बाबत.
११. संस्थेच्या इमारत दुरुस्ती कामास मंजुरी देणेबाबत..
१२. सभेस अनुपस्थित सभासदांना क्षमापित करणेबाबत.
१३. मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

स्थळ - वि.का.से.सो. कार्यालय, निघोज
दिनांक - १०/०९/२०२४

सचिव
संचालक मंडळाच्या आदेशावरुन
निघोज विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या,निघोज
ता.पारनेर, जि.अ.नगर

टिप - १. कोरम अभावी सभा तहकुब झाल्यास ती त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सुरू करण्यात येईल. सदर सभेचा कोरमची आवश्यकता असणार नाही.
२. सभासदांना कोणत्याही प्रकारची माहिती वार्षिक सर्वसाधारण सभेत पाहिजे असल्यास तसेच काही प्रश्न आगर सूचना घ्यावयाच्या असल्यास तीन दिवस अगोदर कार्यालयात लेखी स्वरूपात द्याव्यात अन्यथा त्याचा विचार करणे शक्य होणार नाही.
३. सभासदांना संस्थेची आर्थिक पत्रके ताळेबंद नफा तोटा पत्रके संस्थेमध्ये पाहावयास मिळतील.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com